Celebrating Cinema
PIFF Pune International Film Festival

कृपया प्रसिद्धीसाठी
१९ फेब्रुवारी २०२५

# २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची आज सांगता !!

*स्पर्धा विभागातील पुरस्कारांचे वितरण संपन्न होणार !!*

२३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची आज गुरुवार दि. २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.०० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे समारंभपूर्वक सांगता होईल. The Room Next Door , Country: Spain ,Dir: Pedro Almodóvar या चित्रपटाने महोत्सवाची (क्लोजिंग फिल्म) सांगता बालगंधर्व रंगमंदिर येथे होणार आहे.

आंतरराष्ट्रीय ज्यूरी मार्को बेचिस - चिली-इटालियन चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक, मार्गारिडा गिल - पोर्तुगीज चित्रपट निर्माती आणि शिक्षिका,पेट्री कोटविका - पोर्तुगीज चित्रपट निर्माती आणि शिक्षक, तमिनेह मिलानी - इराणी चित्रपट निर्माता आणि पटकथा लेखक, जोर्डजे स्टोजिल्जकोविक - सिनेमॅटोग्राफर सर्बिया,सुदथ महादिवुलवेवा - श्रीलंकन चित्रपट दिग्दर्शक, अर्चना - तमिळ - दक्षिण भारतीय अभिनेत्री,अनिरुद्ध रॉय चौधरी - भारतीय चित्रपट दिग्दर्शक हे आंतरराष्ट्रीय ज्युरी देखील उपस्थित राहून या चित्रपट महोत्सवातील जागतिक व मराठी स्पर्धात्मक विभागातील विजेत्यांच्या नावांची घोषणा करतील. या सांगता समारंभात हे सर्व पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केले जातील.

महाराष्ट्र शासन प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट’ १० लाख रुपये, ‘महाराष्ट्र शासन प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक’ ५ लाख रुपये आणि ‘महाराष्ट्र शासन संत तुकाराम सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट’ ५ लाख

रुपये अशी पारितोषिके महाराष्ट्र शासनातर्फे या महोत्सवात दिली जातील . तसेच अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळातर्फे सर्वोत्कृष्ट मराठी दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री, पटकथा ,संवादलेखक व सिनेमोटोग्राफर यांना प्रत्येकी २५ हजार रुपये अशी पारितोषिके दिली जातील .

पुणे फिल्म फाउंडेशन, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व दादासाहेब फाळके चित्रनगरी, मुंबई यांच्या संयुक्त विद्‌यमाने महोत्सवाचे आयोजन केले गेले .